आकाशवाणी पुणे

प्रादेशिक वृत्त विभाग

पुणे वृत्तांत

वेळ-संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक- 31.03.2025 वार-सोमवार

---

नदीसंवर्धन

पुणे महापालिकेतर्फे राबवण्यात येणाऱ्या मुळा-मुठा नदी संवर्धन प्रकल्पाला केंद्र सरकारतर्फे 171 कोटी रुपयांचा अनुदान निधी देण्याचा आदेश देण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून आणि जपानच्या जायका कंपनीकडून महापालिकेला अनुदान दिलं जाणार आहे. त्या अंतर्गत केंद्र शासनाने 2024-25 या आर्थिक वर्षात या प्रकल्पासाठी 371 कोटीं रुपयांचा निधी मंजूर केला होता. या निधीतील 200 कोटी रुपये महापालिकेला गेल्या दोन महिन्यांत मिळाले असून, उर्वरित 171 कोटीं रुपयांच्या अनुदानाचा आदेशही केंद्र शासनानं दिला आहे. अशी माहिती महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी पत्रकारांना दिली.

करसंकलन

2024-25 या आर्थिक वर्षाचा आजचा शेवटचा दिवस असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने थकबाकीदार मालमत्ताधारकांना तात्काळ कर भरण्याचं आवाहन केलं आहे. आज रात्री बारा वाजेपर्यंत कर भरता येणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी करसंकलन विभागाने शहरातील 18 विभागीय करसंकलन कार्यालये आणि कॅश काउंटर्स

खुली ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याचं  सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी कळवलं आहे.

ईद

ईद ऊल फित्र अर्थात रमजान ईद आज देशभर उत्साहात साजरी करण्यात येत आहे. पुण्यातही आज मशिदींमध्ये नमाज अदा करण्यात आली. पुणे सोलापूर रस्त्यावरील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिमधर्मीय नागरिकांनी सामूहिक नमाज अदा केली. सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नेत्यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबाचं फुल देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

प्रकटदिन

स्वामी समर्थांच्या प्रकट दिनानिमित्त आज पुण्यातील विविध मठांमध्ये धार्मिक कार्यक्रम आणि विशेष पूजापाठ करण्यात आला. भाविकांनी सकाळपासूनच स्वामी समर्थांच्या मठ मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली आहे.

‘चेटीचंड’

सिंधी समाजाचे नवीन वर्ष आणि भगवान साई झुलेलाल यांच्या 1075 व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे आज पुण्यात ‘चेटीचंड’ महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचं पूजन करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात झाली. पुणे, पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील सुमारे साडेचार हजार सिंधी बांधवाचा या महोत्सवात सहभाग होता.

मृत्युदरातघट

राज्यात गेल्या पाच वर्षात अर्भक मृत्यु दरात घट होत असल्याचा दावा सार्वजनिक आरोग्य विभागानं केला आहे. राज्याचा नवजात अर्भक मृत्युदर 11 टक्के असल्याचं केंद्र शासनाच्या संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणातून समोर आलं असल्याचं सार्वजनिक आरोग्य विभागानं म्हटलं आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये नवजात शिशूसाठी 55 विशेष काळजी कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षात उपचार देऊन यशस्वीपणे घरी सोडलेल्या बालकांचा दर चांगला असल्याचा दावा राज्याच्या आरोग्य विभागानं केला आहे.

लसीकरण

पुणे शहरात 1 ते 15 वयोगटातील मुला-मुलींसाठी जॅपनीज एन्सेफेलायटीस म्हणजे ‘जेई’ची लस देण्यात येत आहे. पुणे महानगरपालिकेनं 1 मार्चपासून सुरू केलेल्या या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत 2 लाख 26 हजार मुला– मुलींना लस दिली गेली आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या लसीकरणासाठी आपल्या जवळील शाळा, अंगणवाडी केंद्र किंवा पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा, असं आवाहन सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर राजेश दिघे यांनी केलं आहे.

कनेक्टिंगट्रस्ट

स्त्रिया बहुतेकवेळा अवास्तव अपेक्षा आणि स्वतःविषयीचा अपराधी भाव घेऊन जगतात; त्यामुळे या भावनेचा ताण असह्य होऊन अनेक स्त्रिया आत्मघातकी विचारांपर्यंत पोचतात, असं निरीक्षण पुण्यात झालेल्या एका परिसंवादात मान्यवर वक्त्यांनी नोंदवलं. आत्महत्या प्रतिबंधासाठी समुपदेशनाचं महत्त्वाचं सामाजिक कार्य करणाऱ्या 'कनेक्टिंग ट्रस्ट'च्या

विसाव्या वर्धापन दिनानिमित्त शनिवारी 'लिसनिंग टू द व्हाईसेस ऑफ वुमेन' या विशेष परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं. एकेएस फाऊंडेशनच्या संस्थापक बरखा बजाज, 'माहेर' संस्थेच्या संस्थापक सिस्टर ल्यूसी कुरियन, विधिज्ञ संध्या देशपांडे, तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्त्या कादंबरी शेख, वरिष्ठ संपादक कोरिना मॅन्यूअल यांनी यावेळी विचार मांडले. समाजशास्त्र अभ्यासक डॉ. मेघा देऊसकर यांनी परिसंवादाचं संचलन केलं.

जलतरणतलाव

पुणे महापालिकेच्या पाच जलतरण तलावांमध्ये यूव्ही फिल्टर बसविले जाणार आहेत. या प्रकारचे फिल्टर बसविणारी पुणे ही राज्यातील पहिली महापालिका ठरणार आहे. पुणे महापालिकेच्या जलतरण तलावांमध्ये पाण्याचे शुद्धीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात क्लोरिनचा वापर केला जातो. क्लोरिनच्या अतिवापरामुळे अनेकांना त्वचा, श्वसनाचे आजार होतात. त्यावर उपाय म्हणून हे फिल्टर लावण्यात येणार आहेत.

पाणीपुरवठाबंद

पुणे महापालिकेच्या विविध जलशुध्दीकरण केंद्रात देखभाल दुरूस्तीची कामं करण्यात येणार आहेत. त्यामुळे येत्या गुरूवारी रोजी संपूर्ण पुणे शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्याचं महापालिका प्रशासनानं कळवलं आहे.

हवामान

पुणे आणि परिसरात आज सकाळ पासूनच आकाश अंशतः ढगाळ आहे. कमाल तापमान 39 तर किमान तापमान 21 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही आकाश अंशत: ढगाळ राहील, तसंच हलक्या पावसाचाही पुणे वेधशाळेचा  अंदाज आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतामध्ये, नमस्कार.